# आशियाई राष्ट्रातील लोकशाही : आव्हाने व उपाय.

**प्रा. डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत,** राज्यशास्त्र विभाग,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी

---

**अ. प्रास्ताविक –**

सद्यकाळात लोकशाहीचा विचार करता आशिया खंडातील नव्हेतर संपूर्ण जगातील लोकशाही समोर असंख्य आव्हाने उभा राहिली आहेत. भारत किंवा आशिया त्याला अपवाद नाही. राष्ट्रातील अंतर्गत सुरक्षा, बाह्य सुरक्षा, दहशतवाद, प्रादेशिकतावाद, राष्ट्रातील अंतर्गत विविध समस्या, वाढते गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार आणि काही विशिष्ट राजकीय पक्षांची धोरणे, राजकीय नेतृत्वाने विशिष्ठ महत्वकांक्षा ठेऊन राज्यघटनेत केलेले बदल व त्याद्वारे सत्ता अबाधित ठेवण्याची प्रक्रिया अश्या अनेक बाबींमुळे आशियायी राष्ट्रातील लोकशाही समोर आव्हाने निर्माण झाली आहेत. या सर्व आव्हानांवर मार्ग काढून लोकशाही स्थिर करणे, तिला बळकटी देणे गरजेचे आहे. त्यातून जागतिक शांतता व सुरक्षितता ठेवणे आवश्यक बनले आहे. कारण जगाशी या खंडाची तुलना करता असे दिसते की, सर्वाधिक लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्रफळ येथे आहे. म्हणून वरील सर्व बाबींचे आशिया खंडातील लोकशाही राष्ट्रांच्या संदर्भातील अध्ययन प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे.

**कीवर्ड** – लोकशाही, शासनव्यवस्था, राष्ट्रे, राजकीय नेतृत्व, धोरणे, राज्यघटना, गुन्हेगारीकरण, आव्हाने, सत्तास्पर्धा.


**ब. उद्दिष्ट्ये –**

प्रस्तुत शोध निबंधाची मांडणी करताना आशियाई राष्ट्रातील लोकशाही समोर उभारलेल्या आव्हानांचा अभ्यास करणे व त्या विविध आव्हानांवर उपाययोजना सुचविण्याचा उद्देश ठेवला आहे. जेणेकरून लोकशाही शासन व्यवस्था मजबूत राहील.

**क. आशियातील लोकशाही राष्ट्रे व त्यांचे वर्गीकरण -**

आशिया खंडात एकूण ४८ देश आहेत. जगाशी या खंडाची तुलना करता असे दिसते की, सर्वाधिक लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्रफळ येथे आहे. तर आशिया खंडातील लोकशाही राष्ट्रांच्या संदर्भात विचार करता असे दिसते की, येथील राष्ट्रे व त्यांच्या शासनव्यवस्थेत विविधता आढळते. आशियात प्रामुख्याने भारत, चीन, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, जपान, इंडोनेशिया, दक्षिण कोरिया, फिलिपिन्स, तैवान, मलेशिया, थायलंड आणि सिंगापूर या राष्ट्रामध्ये कमीअधिक प्रमाणात लोकशाही शासनव्यवस्था अस्तित्वात आहे. भारत व जपानमध्ये संसदीय शासन व्यवस्था तर दक्षिण कोरियात अध्यक्षीय शासन व्यवस्था आहे. इंडोनेशिया व फिलिपिन्समध्ये राष्ट्रपती प्रधान शासन व्यवस्था आहे. तर थायलंड, सिंगापूर व मलेशियामध्ये राजेशाही व लोकशाहीचे मिश्रण पहावयास मिळते. प्रामुख्याने त्याचे तीन भागात वर्गीकरण करता येते. ते पुढीलप्रमाणे आहे.

**१. आशियातील लोकशाही राष्ट्रांचे वर्गीकरण.**




| आशियातील लोकशाही राष्ट्रे | | |
|---|---|---|
| संपूर्ण लोकशाही स्वीकारलेली राष्ट्रे | अंशतः लोकशाही स्वीकारलेली राष्ट्रे | लोकशाही व राजेशाही मिश्र व्यवस्था स्वीकारलेली राष्ट्रे |

| | | |
|---|---|---|
| भारत, जपान, तैवान, फिलिपिन्स, इंडोनेशिया, दक्षिण कोरिया, | पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, मलेशिया, थायलंड, सिंगापूर | मलेशिया, थायलंड, भूतान, कंबोडिया, सिंगापूर |

अश्या पद्धतीने सर्वसाधारणपणे आशियातील लोकशाही राष्ट्रांचे वर्गीकरण करता येते. परंतु ते तंतोतंत आहे असे मात्र म्हणता येत नाही. कारण जागतिक व राष्ट्रांतर्गत विविध बाबी व घडामोडींचा त्यावर सातत्याने प्रभाव पडत असतो. परिणामी शासनव्यवस्थेत वारंवार बदल होत असतो. थोडक्यात आशिया खंडातील लोकशाही राष्ट्रांबाबत अशी सद्यस्थिती असलेली दिसते.

**ड. आशियाई राष्ट्रांतील लोकशाही समोरील आव्हाने –**

आशियाई राष्ट्रांतील लोकशाही समोर सद्यकाळात विविध आव्हाने उभी राहिली आहेत. ही आव्हाने राष्ट्रांतर्गत व राष्ट्रांबाहेरील घटकांमुळे उभी राहिली आहेत. त्यातील महत्वाच्या आव्हानांचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

**१. राजकीय अस्थिरता व सत्ताबदल –**

आशियातील लोकशाही राष्ट्रांसमोर सध्या राजकीय अस्थिरता व वारंवार होणारा सत्ताबदल हे आव्हान उभे राहिले आहे. पाकिस्तानमध्ये वारंवार सत्ताबदल होत आहे तर पाक व बांग्लादेशमध्ये लष्करी हस्तक्षेप दिवसेंदिवस वाढत आहे. ज्यामुळे लोकशाहीस धोका निर्माण झाला आहे. मध्य आशियातील राष्ट्रामध्येही याच कारणाने राजकीय अस्थैर्य निर्माण झाले आहे. तेथे सत्तेचे केंद्रीकरण, वांशिक संघर्ष व दहशतवाद वाढत आहे. परिणामी आशियातील लोकशाही धोक्यात आली आहे.

**२. भ्रष्टाचार –**

आज आशियातील अनेक लोकशाही देशांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार वाढत चालला आहे. वाढत्या भ्रष्टाचारामुळे या राष्ट्रांमध्ये अनेक शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना अडचणी येत आहेत. योजनेमार्फत पुरवला जाणारा जो निधी जनतेला मिळणे आवश्यक आहे, तो प्रशासकीय सेवक, राजकीय नेतृत्व व इतर काही खासगी कंपन्यांकडे जाताना दिसतो आहे. परिणामी जनतेचा शासनावरील विश्वास कमी होत चालला आहे. एकूणच आशियाई देशांमधील शासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिवाय राष्ट्राच्या विकासामध्ये असंख्य अडचणी येत आहेत. या सर्व बाबींचा आणि भ्रष्टाचाराचा विपरीत परिणाम राष्ट्रातील जनतेवर होत आहे. त्यांचे सामाजिक, आर्थिक जीवनमान खालावत आहे. भारत, इंडोनेशिया, फिलिपिन्स व पाकिस्तान या राष्ट्रात प्रचंड भ्रष्टाचाराची उदाहरणे पुढे आली आहेत. परिणामी भ्रष्टाचार ही लोकशाही समोर गंभीर समस्या उभारली आहे.

**३. लोकशाही तत्वांचे उल्लंघन व अपालन –**

आशियातील लोकशाही राष्ट्रांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय अशा अनेक लोकशाही तत्त्वांचे उल्लंघन होताना दिसत आहे. मानव अधिकाराचे उल्लंघन, पत्रकारांना केलेली दडपशाही आणि विरोधी राजकीय पक्षातील नेतृत्वावर झालेली कारवाई अशा अनेक बाबींमधून लोकशाही मूल्यांचे उल्लंघन झाल्याचे दिसते. उदाहरणार्थ म्यानमारमध्ये रोहिंग्या लोकांवर मुस्लिम समाजाने केलेला अन्याय, अत्याचार,शिवाय त्यांचे नागरिकत्व काढून घेणे इत्यादी. चीनमध्ये पत्रकारिता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यांवर बंधने घातली आहेत. चीन सरकारने इंटरनेटवरील माहिती प्रसारित करण्यावर नियंत्रण ठेवले आहे. थोडक्यात सरकारविरोधी लेखन केल्यास तुरुंगात टाकले जाते. तसेच भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश या राष्ट्रांमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक अल्पसंख्यांक समुदायांना त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी व त्या हक्कांच्या संरक्षणासाठी संघर्ष करावा लागत आहे. थोडक्यात अल्पसंख्यांकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन या राष्ट्रांमध्ये होत आहे. अफगाणिस्तानमध्ये तालिबान सत्तेच्या विरोधात तेथील महिलांनी शिक्षण व काम करण्याच्या अधिकारावर लादलेली बंधने उठवण्यासाठी आंदोलने केली. तर फिलिपिन्स, इंडोनेशिया व मलेशिया या राष्ट्रांमध्ये आदिवासी आणि स्थानिक समुदायांचे जमिनीवरील हक्क रद्द केल्यामुळे त्यांच्या मूलभूत हक्कावर आक्रमण झाले आहे. थोडक्यात अशा विविध मार्गाने मूलभूत हक्कांचे उल्लंघन होणे म्हणजे लोकशाही समोरील उभारलेले महत्त्वाचे आव्हान होय. तर दुसऱ्या बाजूला १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यामुळे मध्य आशियातील राष्ट्रांना (किर्गिझिस्तान, कझागस्थान, तुर्कमेनिस्थान, ताजिकीस्थान, उझबेकिस्थान) स्वातंत्र मिळाले. या राष्ट्रांत लोकशाही तत्वांचे पालन करण्यात अनेक अडचणी येत आहेत. कारण या राष्ट्रांना स्वातंत्र मिळाले तरी जुने कम्युनिष्ट नेतेच पुढेही सत्तेवर राहिले आहेत.

**४. आर्थिक विषमता –**

आशियातील राष्ट्रांमध्ये आर्थिक विषमता वाढत आहे. प्रामुख्याने वाढते शहरीकरण, शिक्षणातील तफावत व सरकारची आर्थिक धोरणे या बाबींमुळे आर्थिक विषमता वाढत आहे. या आर्थिक विषमतेचा राजकीय परिणाम आशियाई

राष्ट्रातील लोकशाही शासनव्यवस्थेच्या स्थैर्यावर होत आहे. तसेच आर्थिक विषमतेमुळे आशियाई राष्ट्रात सामाजिक तणाव वाढत आहे. विविध समाज गटांमध्ये तणाव निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडत आहे. विविध गटांचा निवडणुकीतील राजकीय सहभाग कमी होत आहे. ज्यामुळे त्यास परिपूर्ण लोकशाही म्हणायचे की नाही असे प्रश्न निर्माण झाले आहेत. तसेच आशियाई राष्ट्रातील लोकशाही व्यवस्था असलेल्या राष्ट्रांत सार्वजनिक सेवांमध्ये नागरिकांना मिळणारे स्थान यामध्ये फरक केल्यामुळे मानवी विकासाची उद्दिष्टे पूर्ण करणे किंवा लोकशाही मजबूत करणे कठीण होत चालले आहे. थोडक्यात आर्थिक विषमतेमुळे सामाजिक व राजकीय अस्थिरता निर्माण होऊन लोकशाहीस धोका निर्माण झाला आहे. ही आर्थिक विषमता व तिचे परिणाम प्रामुख्याने भारत, इंडोनेशिया, पाकिस्तान व बांगलादेश या राष्ट्रांमध्ये होताना दिसत आहेत.

**५. दहशतवाद व राष्ट्रांतर्गत सुरक्षेसमोरील आव्हाने –**

भारत, चीन, नेपाळ, जपान, पाकिस्तान व अफगाणिस्तान अशा अनेक आशियाई राष्ट्रांना आज दहशतवादाने ग्रासले आहे. या राष्ट्रांना अंतर्गत सुरक्षिततेतही असंख्य समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. प्रामुख्याने सीमा सुरक्षा, लोकशाही संस्थांवर होणारे अतिरेकी हल्ले अशा अनेक बाबींमुळे लोकशाही समोर नवनवीन आव्हाने निर्माण होत आहेत. दहशतवाद व अंतर्गत लष्करी कारवायांमुळे नागरिकांचे सामाजिक जीवन भीती व संशयाने भरले आहे. शिवाय राष्ट्राच्या आर्थिक विकासावर, पर्यटन व विविध उद्योगावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

**इ. लोकशाही समोरील आव्हानावरील उपाययोजना –**

आशियाई राष्ट्रातील लोकशाही शासनव्यवस्थेची जपणूक करण्यासाठी, तिला बळकटी देण्यासाठी विविध उपाय योजना करता येतील. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१. लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी उपाययोजना –**

आशियाई राष्ट्रातील लोकशाहीच्या विविध मूल्यांची जोपासना करण्यासाठी या राष्ट्रांमधील संविधानामध्ये कायदेशीर संरक्षणाची तरतूद करणे आवश्यक आहे. विविध कायदे तयार करून त्याची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या राष्ट्रांमध्ये सार्वजनिक जागृतता निर्माण करून अभिव्यक्ती व भाषण स्वातंत्र्याच्या माध्यमातून स्वातंत्र्याचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. तसेच विविध आंतरराष्ट्रीय संघटनांनी आशियातील राष्ट्रांवर लोकशाहीच्या जपणुकीसाठी आवश्यकतेनुसार दबाव आणणे गरजेचे वाटते. शिवाय आशियातील नागरिकांवर, पत्रकारांवर व विरोधी नेत्यांवर आणि त्यांच्या अभिव्यक्ती, मुद्रण व भाषण स्वातंत्र्यावर होणारे हल्ले थांबवणे आवश्यक आहे. तर न्यायालयांना पूर्ण स्वातंत्र देवून मुलभूत हक्कावरील हल्ले थाबविले पाहिजेत.

**२. लोकशाहीबाबत जागृती व समतावादी धोरण –**

आशियाई राष्ट्रातील लोकशाही समोरील आव्हानांवर महत्त्वाचा उपाय म्हणजे या राष्ट्रातील लोकशाहीमध्ये समतावादी धोरणाची आखणी करून त्याची अंमलबजावणी करणे होय. लोकशाही व लोकशाहीतील विविध मूल्यांबाबत जनतेमध्ये जागृती करणे आवश्यक आहे. या जागृतीसाठी शैक्षणिक विस्तार व विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच विविध गट-तट, जात, धर्म, पंथ व समुदाय यांच्यात संवाद आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविणे आवश्यक आहे. या कामी आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थांची मदत घेऊन राष्ट्रां-राष्ट्रांमधील व राष्ट्रांतर्गत धार्मिक समस्या सोडविणे आवश्यक आहे.

**३. भेदभावावर प्रतिबंध -**

आशियाई राष्ट्रांतील लोकशाहीची जपणूक करण्यासाठी सर्वच राष्ट्रात सर्वसमावेशक आर्थिक धोरणे राबवावी लागतील. गरीब आणि मध्यमवर्गीयांना ती अनुकूल असतील. जेणेकरून त्याद्वारे राष्ट्रातील सर्व नागरिकांना आर्थिक विकासाची समान संधी उपलब्ध होईल. गरीब श्रीमंत ही दरी कमी होऊन आर्थिक समता प्रस्थापित होईल. शिवाय राष्ट्रातील कर वसुलीच्या पद्धतीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करावा. गरीब नागरिकांना सार्वजनिक सेवेत प्राधान्य द्यावे. त्यामुळे त्यांचा आर्थिक विकास घडून येईल. जेणेकरून लोकशाही समोरील आर्थिक विषमतेचे आव्हान संपुष्टात आणता येईल.

**४. आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ -**

आशियाई राष्ट्रांमध्ये अंतर्गत सुरक्षिततेचा व दहशतवादाचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे तेथील लोकशाहीसमोर आव्हान उभे राहिले आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी आशियातील राष्ट्रांनी एकमेकांना सहकार्य करणे आवश्यक आहे. जर आशियातील राष्ट्रांमध्ये दहशतवाद संपवण्यासाठी एकमत झाले तर लोकशाही अधिक मजबूत होईल. शिवाय दहशतवादातून जो अतिरेकी विचार पुढे आणला जात आहे त्याचा बिमोड करणे शक्य होईल. यासाठी भारताने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

**५. संस्थात्मक सुधारणा व नागरिकांच्या राजकीय सहभाग वाढीसाठी प्रयत्न –**

आशियाई राष्ट्रातील लोकशाही शासन व्यवस्थेसमोरील आव्हाने दूर करण्यासाठी प्रत्येक राष्ट्रांमध्ये संस्थात्मक सुधारणांची आवश्यकता आहे. त्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्थेची व निवडणूक आयोगाची स्थापना करणे आवश्यक आहे. शिवाय ती न्यायव्यवस्था व निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र व पारदर्शक ठेवणे. तसेच भ्रष्टाचार निर्मुलनासाठी संस्था स्थापन करून तिला पूर्ण स्वातंत्र्य देणे, कार्यक्षमपणे काम करू देणे गरजेचे आहे. तर दुसऱ्या बाजूला अशा सर्व संस्थांमधील नागरिकांचा राजकीय सहभाग कसा वाढेल याविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे. निवडणुकांमध्ये नागरिक कशा पद्धतीने सक्रिय सहभागी होतील याविषयी प्रचार प्रसार करणे गरजेचे आहे.

थोडक्यात आशियाई राष्ट्रातील लोकशाही शासन व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी लोकशाही मूल्यांची जोपासना, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि सामाजिक समता या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

**ई. संदर्भ ग्रंथ सूची -**

1. Karmkar Abhishek, Challenges to Democracy in South Asia – Towards an Interdisciplinary Perspective., Navyug books, 2022.
2. Larry Diamond, M. F. Plattner, Y. H. Chu, Democracy in East Asia : A New Century, Johns Hopkins University Press, 2013.
3. Kohli Atul, Democracy and Discontent : India's growing crisis if governability, Cambridge University Press, 1991.
4. Basrur R. M., Challenges to Democracy in India, oxford University Press, 2009.